**महाराष्ट्र शासन**

महत्वाचे/कालमर्यादा,

एमईडी१०१८/ प्र. क्र. ४२३/१८/ शिक्षण-२
**वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,**
नववा मजला, "नवीन मंत्रालय" इमारत,
गोकुळदास तेजपाल रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई-४०० ००१
**दिनांक- ०८/०३/२०१९**

प्रति,

(१) **आयुक्त,**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई**

(२) **संचालक,**
**वैद्यकीय शिक्षण व संशोधन**
**संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई.**

(३) **संचालक,**
**आयुष संचालनालय,**
**महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई.**

**राज्य सीईटी कक्ष, मुंबई**
आवक क्रमांक 1434
दिनांक 9/3/2019
शाखा
प्र.अ. आयुक्त

परिक्षा नियंत्रक

विषय : आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता SEBC प्रवर्गाकरीता आरक्षण लागु करणेबाबत....

संदर्भ : संचालक,वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनाय,मुंबई यांचे पत्र क्र.संवैशिवसं / अधिनियम क्र. ६३/.../२०१८, दिनांक १८.१२.२०१८

महोदय,

**"महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरीता जागांचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे आणि पदांचे) आरक्षण अधिनियम,२०१८"** या कायद्याव्दारे अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था वगळता ईतर शासकीय/शासन अनुदानित/खाजगी विनाअनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाच्या एकुण जागांच्या १६ टक्के जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) वर्गासाठी स्वतंत्रपणे राखुन ठेवण्याची तरतुद करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या जागांसाठी देखील सदर आरक्षण लागु राहील.

Scanned by CamScanner

२. वरीलप्रमाणे १६ टक्के आरक्षण हे **"महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक संस्था (अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, निरधिसुचित जमाती ( विमुक्त जाती ),भटक्या जमाती व इतर मागासवर्ग यांच्याकरीता जागांचे आरक्षण) अधिनियम,२००६"** या कायद्याव्दारे विहीत केलेल्या आरक्षणा - व्यतिरिक्त राहील.

३. आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांच्या जागांवरील प्रवेश करतांना उक्त तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी. तसेच, प्रवेश प्रक्रिया राबवितांना उक्त आरक्षण हे मा.न्यायालयात प्रलंबित प्रकरणांवरील आदेशाच्या अधीन राहील, ही बाब सर्व प्रवेशोच्छुक उमेदवारांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

४. प्रस्तुत पत्र हे सामान्य प्रशासन विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र. १२/१६ ब (सी), दिनांक २१.०२.२०१९ अन्वये दिलेल्या अभिप्रायास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

आपला,

(सुरेन्द्र प्र.चानकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

कुलसचिव,महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ,नाशिक.

* WP (L) 4128/2018
Dr. Uday. G. Dhople
V/S
State of Maharashtra & ors.

Scanned by CamScanner